# डोंगर उतारावर समपातळीत दगडी बांध घालणे

शासनाचे दि.१६ जुलै २००७ च्या शासन निर्णयान्वये कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांच्या खाजगी जमिनीवर डोंगर उतारावर समपातळीत दगडी बांध घालण्याची कामे घेण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

## जागा निवडीचे निकष-

- उपचार राबविण्यासाठी शेतक-यांची नियमानुसार लेखी संमती असणे आवश्यक आहे.
- हा उपचार पाणलोट क्षेत्रांत राबविण्यांत यावा.
- सलग समपातळी चराची कामे न झालेल्या क्षेत्रात सदरची योजना राबविण्यात यावी.
- या योजनेकरीता डोंगर व टेकडयांच्या उतारावरील ज्या जमीनी वरकस व जास्त उताराच्या आहेत व मजगी किंवा सलग समपातळी चराची कामे करण्यास अयोग्य अशा जमिनी निवडण्यात याव्यात. तसेच ज्या ठिकाणी पुरेसा दगड उपलब्ध आहे अशा जागेची निवड करावी.
- दगडांची बाहेरून वाहतूक करून बांध घालणे ही बाब या उपचारात अजिबात अभिप्रेत नाही.

## तांत्रिक निकष -

या उपचारासाठी तांत्रिक मापदंडाचा तपशील पुढीलप्रमाणे राहील.

| उतारगट | तांत्रिक मापदंड | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पाया रूंदी मी. | बांधाची उंची मी. | माथा रूंदी मी. | बाजू उतार | बंाधाचा काटछेद(चौ.मी.) | बांधाची लांबी मी. |
| १० टक्के पर्यंत | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ७४० |
| ११ ते१४ टक्के पर्यंत | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ८०० |
| १४ टक्के पेक्षाजास्त | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ८७० |

डोंगर उतारावर समपातळीत घालण्यात येणाऱ्या दगडी बांधाचे संकल्पचित्र

